लोकमत

# रंगमंचावर लैंगिकतेवर बोलले जातेय, बोलायला हवे!

## अभिवाचनाचा आविष्कार । कादंबरीवर आधारलेले 'वाफाळलेले दिवस'

**प्रज्ञा केळकर-सिंग।**
लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : लैंगिकता या नाजूक विषयावर खुलेपणाने बोलण्याचा, संवाद साधण्याचा प्रयत्न वाचिक नाट्य, नाटक, अभिवाचन अशा माध्यमांमधून केला जात आहे. प्रतीक पुरी लिखित 'वाफाळलेले दिवस' या कादंबरीवर आधारित वाचिक नाट्य किंवा डॉ. नितीन कुमार लिखित 'त्या चार योनींची गोष्ट' हे नाटक या माध्यमातून लैंगिकतेबाबत खुलेपणाने भाष्य करून समाजात जनजागृतीचा प्रयत्न केला जात आहे. 'वाफाळलेले दिवस' चे प्रयोग सादर करण्यासंदर्भात पुण्यातील शाळा आणि महाविद्यालयांशी पत्रव्यवहारही करण्यात आला आहे.

लैंगिकता हा विषय समाजात आजही खुलेपणाने बोलला जात नाही. याबद्दल केवळ कुजबूजच करायची, असे संस्कारच नकळत मुलांवर केले जातात. योग्य व्यक्तीकडून योग्य वेळी अचूक माहिती न मिळाल्याने लैंगिकतेविषयी गैरसमज पसरतात आणि त्याचे विपरित परिणाम समाजालाच भोगावे लागतात. किशोरवयीन मुलांमध्ये लैंगिकतेबद्दल असलेले गैरसमज किंवा स्त्रियांच्या लैंगिक संबधांबद्दलच्या अपेक्षा याबद्दल अनेकदा चर्चा होत नाही. मात्र, कलाविष्काराच्या माध्यमातून हे विषय लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे.


'वाफाळलेले दिवस'चे लेखक प्रतीक पुरी म्हणाले, 'वयात येण्याच्या प्रक्रियेमध्ये मुलांना आणि मुलींना लैंगिकतेविषयी कुतूहल, शंका आणि प्रश्नही असतात. या वयात योग्य शिक्षण मिळाल्यास लैंगिक सक्षमीकरण होऊ शकते. सध्या मुलींपेक्षा मुलांच्या लैंगिक सक्षमीकरणाची जास्त गरज भासू लागली आहे. स्त्रीकडे लैंगिकतेच्या दृष्टिकोनातून न पाहता, माणूस म्हणून आदराने पाहण्याची भावना मुलांमध्ये वाढीस लागायला हवी. योग्य प्रकारे संस्कार झाल्यास मुलांची सुजाण पिढी घडू शकेल.

स्त्रीला पुरुषाची भीती न वाटता आधार वाटला पाहिजे. मुले केवळ पुरुष न होता स्त्रीला समजून घेणारा चांगला माणूस, मित्र झाला पाहिजे, या हेतूने 'वाफाळलेले दिवस' चे प्रयोग शाळा आणि महाविद्यालयांमध्ये सादर करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. हा प्रयोग पाहिल्यानंतर एकमेकांशी आवर्जून बोला, प्रश्न विचारा, शंकानिरसन करा, संवाद साधा असे मला वाटते. अनेक पालक मुलांबरोबर प्रयोग पाहायला येतात. यातून त्यांच्यातील संकोच दूर होतो आणि संवादाचे बळ मिळत आहे.'



◆ इतर अवयवांप्रमाणेच लैंगिक अवयव हेही शरीराचा अविभाज्य भाग असतात. तरीही लैंगिक अवयवांबद्दल बोलायला अनेकांना संकोच वाटतो. विशेषत: स्त्रियांच्या लैंगिक अवयवांबद्दल जाहीरपणे बोलायचे नाही, असा अलिखित नियमच पाळला जातो. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये आजही स्त्रीची लैंगिक इच्छा, अपेक्षा याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही.

◆ मुळात स्त्रीने लैंगिक इच्छेबद्दल, लैंगिक अवयांबद्दल बोलणे जणू समाजमान्यच नाही. या विषयाला डॉ. नितीन कुमार यांनी 'त्या चार योनींच्या गोष्टी' या नाटकातून थेट वाचा फोडण्याचा प्रयत्न केला आहे. प्रेक्षकांनी इतर नाटकांप्रमाणे अशा विषयांवरील नाटकांबाबत साक्षर होणे गरजेचे आहे, असे मत त्यांनी 'लोकमत'शी बोलताना मांडले.



प्रतीक पुरी

**स्त्रियांचा सन्मान करण्याची वृत्ती मुलांत रुजवण्याचे काम निकोप लैंगिक साक्षरतेद्वारेच होऊ शकते. पुरुष लैंगिकता शिक्षणात सक्षम झाले, तर ते स्त्रियांची लैंगिकता समजून घेतील, त्यांचा उचित मान ठेवतील. तेव्हाच आपल्याकडे खरी स्त्री-पुरुष समानता येईल. त्यासाठी पालकांनाच आपला मुलगा वयात येत असताना अधिक मोकळे व्हावे लागेल, त्याच्याशी संवाद साधावा लागेल.**

# मुलगा वयात येताना...



लैंगिकता ही अशी एक दोरी आहे, जिला साप समजून झोडपण्याकडेच लोकांचा कल जास्त असतो किंवा मग तिच्यापासून पळ काढण्याचा. त्याच्याविषयी बोलायचे झाले तरी ते आडवळणाने, सांकेतिक शब्दांत, कुजबुजत बोलले जाते. उघडपणे बोललो, तर त्याला अश्लील म्हटले जाते. का वागतो आपण असे? मी वयात येत होतो, तेव्हापासून हा प्रश्न मला सतावतोय. आजही त्याचे उत्तर पूर्णपणे मिळालेले नाही. म्हणून मी या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा माझ्यापुरता प्रयत्न केला. त्याचे फलित म्हणजे माझी 'वाफाळलेले दिवस' ही कादंबरी. वयात येणाऱ्या एका चौदा वर्षांच्या मुलाची ही कथा. ती त्याच्या मित्रांचीही कथा आहे. माझ्या घरी आई-वडील, मोठा भाऊ, मोठ्या दोन बहिणी होत्या; पण मी जेव्हा लैंगिकतेच्या अनाकलनीय भोवऱ्यात गटांगळ्या खात होतो, त्यावेळी यापैकी कोणीही मला वाचवायला आले नाही. तसे काही करण्याची गरज आहे असे कोणालाही वाटले नाही. मला स्वतःलाही त्यांनी माझ्या मदतीला यावे असे तेव्हा वाटले नाही. आज मात्र ते वाटते. त्यांनी त्या वयात मला समजून घेतले असते, माझ्या प्रश्नांची उत्तरे दिली असती, तर कदाचित मी अधिक प्रगल्भपणे वयात येऊ शकलो असतो.

सुदैवाने मी कोणत्याही चुकीच्या मार्गाला लागलो नाही; पण याचा अर्थ मला सारे सहज सोपे गेले असेही नाही. लहान वयात माझ्यावर लैंगिक अत्याचार झाले. त्याचे स्वरूप सौम्य होते आणि त्याला लैंगिक अत्याचार म्हणतात याचीही मला तेव्हा कल्पना नव्हती, ती आज आहे. मी या गोष्टी कधी घरी सांगू शकलो नाही; कारण तसे वातावरणच नव्हते. आपल्या समाजातच तसे वातावरण नाही. दुर्दैवाने आजही ते नाही. मुलगा १६ वर्षांचा झाला, की वडील-मुलाचे नाते मैत्रीचे असावे असा एक संकेत आहे आपल्याकडे. प्रत्यक्षात तो कधीच पाळला जात नाही. वडील-मुलाचे आपल्याकडचे नाते हे निव्वळ धाकाचे, दडपशाहीचे असते. त्यात संवाद नसतोच. लैंगिकतेवर मुलाने बापाला प्रश्न विचारणे, ही सर्वथा अविश्वसनीय बाब समजली जाते.

खरे तर, वडिलांनीच स्वतःच्या अनुभवावरून, पुढाकार घेऊन मुलांना या गोष्टी सांगायला हव्यात. जशी आई आपल्या लेकीला सांगते. स्त्रियांमध्ये हा भाग खासगी असला, तरी तो काटेकोरपणे पाळला जातो. स्त्रियांच्या लैंगिकतेविषयी आता अगदी उघडपणे संवाद साधला जातो. असे बोलणे हे पुरोगामीपणाचे, आधुनिक आणि स्त्रीसमानतेला प्रोत्साहन देणारे मानले जाते. त्याचवेळी पुरुषांच्या लैंगिकतेविषयी बोलले जात नाही. योनीचा उल्लेख सहजपणे केला जातो, मासिक पाळीविषयी बोलले जाते; पण लिंग, वीर्यस्खलन याविषयी बोलायचे म्हटले, की लोकांना काटे टोचतात.

> **स्त्रियांना घरीदारी होणारी मारहाण, शिवीगाळ, त्यांना कायम मुलांच्या तुलनेत मागे ठेवण्याचा प्रकार, अपमान, अतिरिक्त बंधने यातून कळत नकळत वयात येणाऱ्या मुलांमध्ये स्त्रीविषयी चुकीची प्रतिमा तयार होते. त्यांच्यापेक्षा आपणच श्रेष्ठ आहोत ही भावना निर्माण होऊ लागते, ज्यातून ते बाहेर पडू शकत नाहीत आणि दुर्दैवाने स्त्री अत्याचाराचे आरोपी ठरण्याची भीतीही नाकारता येत नाही.**

वडिलांनी मुलाच्या वयातले बदलते टप्पे समजून त्याच्याशी संवाद साधायला हवा. हे त्याला सांगण्याची जबाबदारी वडिलांचीच आहे. त्याला स्त्रीदेहाविषयी वाटणारे आकर्षण हे चुकीचे नाही, तर नैसर्गिक आहे; पण त्यात आकर्षणाची मर्यादा ओलांडली जाणार नाही, याचा इशारा देण्याचीही जबाबदारी वडिलांचीच आहे. हे मात्र होत नाही. त्याऐवजी त्या मुलाला केवळ मार पडतो. तो किती नालायक आहे, वाया गेलेला आहे हेच ऐकून घ्यावे लागते. त्याला आत्मसन्मान आहे, याचा कसलाही विचार न करता त्याचा अपमान केला जातो. आपल्या घरीच असा अपमान झाल्यानंतर त्या मुलाच्या भावना विकृत होत गेल्या, तर त्यासाठी त्या मुलाला दोष कसा द्यायचा? वडिलांना यात आपला दोष काहीच दिसून येत नाही. त्यांच्या वेळेस त्यांच्या वडिलांनीही त्यांना असे काही सांगितलेले नसते, तोच किता तेही गिरवतात; पण काही प्रसंगी स्वतः ठेचकाळल्यानंतर आपल्या मुलाला सावध करावे, इतकीही जबाबदारी त्यांनी उचलू नये का?

मी असेही म्हणेन, की स्त्रियांनीही पुरुषांना लैंगिकता शिकवण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. मग ती आई असेल, बहीण असेल, मैत्रीण असेल किंवा पत्नी असेल. त्यांनीही कोणत्याही संकोचाविना आपल्या भवतालच्या पुरुषांना समजून घेतले, तर लैंगिकतेचे हे धडे गिरवायला खूप मदत होईल. मुळात लैंगिकता म्हणजे केवळ संभोग नाही. त्यांत तुमच्या लैंगिक अवयवांची माहिती करून घेणे, त्यांची देखभाल कशी करायची ते शिकणे, आपल्यापेक्षा स्त्री देह कसा वेगळा आहे हे समजून घेणे, मोठे होत जाताना काय धोके असू शकतात ते जाणून घेणे, चुकीच्या मार्गाने आपल्या लैंगिक प्रश्नांची उत्तरे शोधली, तर त्याचा आपल्याला आणि इतरांनाही किती त्रास होऊ शकतो हे समजून घेणे, अशा अनेक बाबी येतात. मुख्य म्हणजे, स्त्रियांचा सन्मान करण्याची वृत्ती आपल्या मनात रुजवण्याचे काम निकोप लैंगिक साक्षरतेद्वारेच होऊ शकते. आज मोबाइलवर इंटरनेटमुळे मुले सर्रास पॉर्न बघतात. त्यांच्या दृष्टीने स्त्री ही केवळ भोगवस्तू आहे. तशीच मानसिकता रुजवणारी धंदेवाईक वृत्ती सगळीकडे पसरलेली आहे. या विळख्यातून त्यांना सोडवणे, ही मोठी समस्या आपल्या सर्वांसमोर उभी आहे.

▸▸ उर्वरित पान...२

पान १ वरून

# मुलगा वयात येताना ...


सगळे काही सहज मिळते त्याचप्रमाणे स्त्रीही सहजपणे मिळते, हे मुलांच्या मनावर या ना त्या माध्यमातून बिंबवले जाते. मग ते चित्रपट असतील, जाहिराती असतील, पॉर्न असेल. यातून त्यांच्या मनात स्त्रियांविषयीची प्रचंड नकारात्मकता तयार होते. आपल्या मागणीला तिने होकार द्यायलाच हवा, हा अट्टहासही तयार होतो. त्यातूनच बलात्काराचे गुन्हे घडतात. अत्यंत क्रूर पद्धतीने मुलींवर बलात्कार केले जातात आणि हिंस्र पद्धतीने त्यांना मारण्यातही येते. विशी-पंचविशीची मुले असतात ही सारी. कुठून येते त्यांच्यात ही विकृती? दुसरीकडे अल्पवयीन मुलगे-मुली प्रेमात पडून घरून पळून जातात. त्यांच्या घरचे त्यांना एक तर कायमचे सोडून देतात किंवा मारूनच टाकतात. का तर ऑनर किलिंग! या दोन्ही गोष्टी चुकीच्या आहेत. यात पुन्हा घरच्या पुरुषांचाच पुढाकार जास्त असतो. प्रेम करणे ही अत्यंत भीतीदायक किंवा अब्रूला काळीमा फासणारी गोष्ट आहे, असेच त्यांना वाटते. त्यांना शांतपणे समजावण्याचा पर्यायही आपल्याकडे उपलब्ध आहे याचा त्यांना विसरच पडतो; कारण त्यांचीही जडणघडण अशीच झालेली असते. त्याचे मूळ आपल्या घरगुती आणि सामाजिक वागणुकीत आहे.

स्त्रियांना घरीदारी होणारी मारहाण, अश्लील शिवीगाळ, त्यांना कायम मुलांच्या तुलनेत मागे ठेवण्याचा प्रकार, केला जाणारा अपमान, यातून कळत नकळत वयात येणाऱ्या मुलांमध्ये स्त्रीविषयी चुकीची प्रतिमा तयार होते. त्यांच्यापेक्षा आपणच श्रेष्ठ




आहोत, ही भावना त्यांच्या मनात निर्माण होऊ लागते, ज्यातून ते बाहेर पडू शकत नाहीत. हे टाळायचे असेल, तर आपल्याला आता लैंगिकतेविषयी मुक्त संवाद साधल्याशिवाय पर्याय नाही. लैंगिक शब्दांचा, क्रियांचा, अनुभवांचा उच्चार उघडपणे केल्याने अश्लिलता वाढत नाही, तर त्याविषयी साक्षरता निर्माण होते. त्यात अभद्र बिभत्स असे काही नसते, हे समजून घ्यायला हवे. या अत्यंत नैसर्गिक गोष्टी आहेत. त्यांच्याविषयी त्याच पद्धतीने सरळ सोप्या भाषेत, मुलगे-मुलींना समजेल अशा पद्धतीने बोलायला हवे, तरच यातला अनाठायी संकोच मारला जाईल. आई-वडिलांनी आपल्या मुलाला लैंगिक अनुभवांविषयी सांगितल्याने, त्यांचा मान त्याच्या लेखी कमी होणार नाही. उलट, त्या मुलाला त्यांच्याविषयी आदरच वाढेल. मुख्य म्हणजे, विश्वास निर्माण होईल, की मला ज्या अडचणी येत आहेत, त्या अगदी सामान्य आहेत. मला काही त्रास झालाच, तर पालकांशी मोकळेपणाने बोलू शकतो आणि ते मला योग्य ते मार्गदर्शन करतील.

मला हे सारे कधी अनुभवता आले नाही. त्यामुळे याविषयी आपणच काहीतरी लिहायला हवे आणि तेही उघडपणे लिहायला हवे, या जाणीवेतूनच 'वाफाळलेले दिवस' जन्माला आली. त्याचा उद्देशच पुरुषांच्या लैंगिक सक्षमीकरणाचा आहे. पुरुष लैंगिकता शिक्षणात सक्षम झाले, तर ते स्त्रियांची लैंगिकता समजून घेतील, त्यांचा उचीत मान ठेवतील. तेव्हाच आपल्याकडे खरी स्त्री-पुरुष समानता येईल. त्यासाठी पालकांनाच थोडा पुढाकार घ्यावा लागेल, थोडे साहस दाखवावे लागेल आणि थोडे अधिक मोकळे व्हावे लागेल. लैंगिकता हा बागुलबुवा नाही, की तो शापही नाही. त्याविषयी बोलण्याने पालकांचे काहीही वाईट घडणार नाही, उलट स्वतःच्या मुलाचे जगणे अधिक सहज सुंदर होण्यासाठी त्याची मदतच होईल.



CS CamScanner



# तरुणांनी अनुभवले 'वाफाळलेले दिवस'

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

तारुण्यसुलभ भावनांवर उपहास आणि विनोदी शैलीतून नेमके भाष्य करणाऱ्या 'वाफाळलेले दिवस' नाटकाला रसिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. नाजूक विषयाची सहजतेने पद्धतीने मांडणी करीत नाटकाने सूचक संदेश दिला. या प्रयोगशील नाटकाचा प्रयोग 'रंगयात्रा' उपक्रमात झाला.

निळू फुले कला अकादमी प्रस्तुत 'वाफाळलेले दिवस' या नाटकाने तारुण्यसुलभ प्रश्नांवर प्रकाश टाकत रसिकांना अंतर्मुख केले. सरस्वती भुवन कला महाविद्यालयाच्या नाट्यशास्त्र विभागाच्या 'रंगयात्रा' उपक्रमात नाटक दाखवण्यात आले. गोविंदभाई श्रॉफ कला अकादमी सभागृहात शुक्रवारी सायंकाळी प्रयोग झाला. प्रतीक पुरी लिखित व राहुल लामखडे दिग्दर्शित 'वाफाळलेले दिवस' नाटकाने किशोरवयीन नायकाची मनोवस्था मांडली आहे. *तारुण्यात येताना* बदलणारा भवताल आणि वास्तवाचे नेमके दर्शन नाटकाने घडवले. नाटकात राहुल लामखडे, सई साठे, किरण नागपुरे, अनिकेत दलाल, राम गोविंदवाड, तन्मय महाजन, सिद्धी सपकाळे, सलोनी सातपुते यांच्या भूमिका होत्या. तांत्रिक सहाय्य राजेश घाडगे, किशोर वाघमारे आणि ओमकार गाडे यांनी केले.

# मधुरिमा

प्रहिलांचे अर्धे आकाश

**आवर्जून वाचावे असे...**
भारतातील अशी काही ठिकाणं, जी फारशी प्रसिद्ध नाहीत पण पर्यटकांना नक्की आवडतील,
**आतील प्रत्येक पानावर...**

महाराष्ट्राचे एकमेव स्वतंत्र वृत्तपत्र

मधुरिमा स्पेशल ▪ सई साठे | sayyo26@gmail.com

**मुलींच्या लैंगिकतेविषयी बोलणं जरा आधुनिक, पुरोगामी आणि स्त्रीवादीही समजलं जातं. पण मुलांच्या लैंगिकतेचा विषय निघाला तर मात्र अळीमिळी गुपचिळी अशी अवस्था असते. मुलांना जणू लैंगिकताच नाही, ती वयातच येत नाहीत आणि त्यांना कोणत्याही लैंगिक समस्या नसतात, असा एक सर्वसाधारण भाव सर्वांच्याच मनात असतो की काय, असं वाटावं अशा पद्धतीने या विषयावर कोणीच काहीच बोलत नाही. अशा प्रश्नांची उत्तरं शोधण्याचा प्रयत्न करणारी, मुलांनाही वयात येण्याचा भीषण त्रास होतो याविषयी त्यांच्या पालकांना जागरुक करणारी एक सहजसुंदर नाट्यकृती म्हणजे प्रतिक पुटी लिखित 'वाफाळलेले दिवस.'**

# मुलीच नाही तर मुलंही वयात येतात बरं का...



मुलींच्या वयात येण्याविषयी मोठ्या प्रमाणात लिहिलं जातं, बोललं जातं. त्यांची मासिक पाळी, वयात येताना त्यांना येणाऱ्या इतर अडचणी, त्यांच्यावरील लैंगिक अत्याचार इत्यादी गोष्टींविषयी उघडपणे लोक बोलत असतात. घरी आई, मोठी बहिणी, नातलग तसेच शेजारच्या काकू, मावशी, त्या मुलीला येता-जाता काही ना काही सांगतच असतात. एकुणातच मुलींच्या लैंगिकतेविषयी बोलणं जरा आधुनिक, पुरोगामी आणि स्त्रीवादीही समजलं जातं. पण मुलांच्या लैंगिकतेचा विषय निघाला तर मात्र अळीमिळी गुपचिळी अशी अवस्था असते.

मुलांना जणू लैंगिकताच नाही, ती वयातच येत नाहीत आणि त्यांना कोणत्याही लैंगिक समस्या नसतात, असा एक सर्वसाधारण भाव सर्वांच्याच मनात असतो की काय, असं वाटावं अशा पद्धतीने या विषयावर कोणीच काहीच बोलत नाही. घरात तो मुलगा आपल्या बहिणीच्या बाबतीत काय होतंय ते बघत असतो, पण आपल्याला कोणीच काही का विचारत नाही, आपल्या प्रश्नांना कोणीच कधी गांभार्यानं का घेत नाही हे त्याला समजत नाही. मोठं होत असताना आपण बायकांकडे, पोरींकडे पाहिलं, मोबाइलवर पॉर्न क्लिप पाहिली, नग्न बायकांची चित्रं असलेली मासिकं चाळली आणि ते जर घरच्यांच्या लक्षात आलं तर दणादण फटके बसायलाच सुरुवात होते. मुलगा वाया गेलाय, हेच सारे त्याला बजावत असतात. त्याच्या अब्रूची लक्तरे त्याच्याच घरचे लोक वेशीवर टांगतात. तो खजील होतो, अपमानित होतो, आपण काहीतरी भयंकर चुकीचं करतोय या जाणिवेनं आतल्याआत कुढत राहतो. त्याचे प्रश्न त्याच्यासोबतच मोठे होत जातात, पण त्यांची उत्तरं त्याला कधीच मिळत नाहीत. एकीकडे आपण मुला-मुलींना समान मानण्याच्या गोष्टी करतो, पण दुसरीकडे त्यांच्या लैंगिकतेविषयी, वयात येण्याविषयी मात्र कसलीही समानता दाखवत नाही. मुलांच्या नेमक्या याच मानसिकतेविषयी अगदी उघडपणे भाष्य करणारी, त्यांना पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरं शोधण्याचा प्रयत्न करणारी, मुलांनाही वयात येण्याचा भीषण त्रास होतो याविषयी त्यांच्या पालकांना जागरूक करणारी एक सहज सुंदर नाट्यकृती म्हणजे प्रतिक पुरी लिखित 'वाफाळलेले दिवस.'

मी या नाट्यकृतीत नायिकेचं काम करते. पहिल्यांदा मी जेव्हा ही अभिवाचन नाट्यकृती पाहिली तेव्हा माझ्याही मनात हेच विचार आले होते की, मुलांना खरंच इतके वेगवेगळे इश्यू असू शकतात. कारण त्याविषयी मी त्याआधी फारसं काहीच ऐकलं नव्हतं की वाचलंही नव्हतं. मुलं वयात येताना मुलींच्या मागे लागतात आणि त्यांतल्याच एखादीच्या प्रेमात पडतात हेच त्यांचं वयात येणं असतं हा माझाही समज होता. पण 'वाफाळलेले दिवस' पाहिल्यानंतर मात्र माझा हा समज पार खोटा ठरला. मूळ कादंबरीचं वाचन केल्यानंतर तर मला अनेक गोष्टी कळत गेल्या, ज्या आजवर एक मुलगी म्हणून मला मुलांविषयी माहितीच नव्हत्या. वयात येताना त्यांच्यात होणारे शारीरिक बदल, त्यांची मानसिक घुसफूस, त्यांची भावनिक उलथापालथ याविषयी मी पहिल्यांदाच इतक्या उघडपणे वाचत होते.

मुलं वयात येतात तेव्हा स्त्रीविषयी त्यांना वाटणारं आकर्षण, त्यांतून त्यांचं होणारं वीर्यस्खलन, त्याचा अर्थ न कळून त्यांची होणारी घालमेल, त्याविषयी घरचे काहीच सांगत नाहीत, बाहेरही कोणी बोलत नाही, काही बोलायला जावं तर सारे डोळे वटारून गप्प करतात, नाहीतर मार देतात, यापलीकडे मुलांच्या लैंगिकतेवर प्रतिक्रिया दिल्याच जात नाहीत. याच ओढाळ वयात व्यसनांची लागण होते, स्त्रीदेहाविषयी अनावर आकर्षण निर्माण होऊन त्याचा उपभोग घेण्याची इच्छा मनात येते. पण हे सारं चुकीचं की बरोबर यावर मात्र मित्रत्वाच्या नात्यानं बोलून त्यांना समजावणारे कोणीही नसतात. ना त्यांच्या घरी ना त्यांच्या आसपास. अशा वेळी त्यांच्यासारखे वाट चुकलेले काही मित्र एकत्र येतात आणि एकमेकांना इथून-तिथून कळलेल्या गोष्टी सांगून आपल्या लैंगिकतेची चिकित्सा करण्याचा तोडका-मोडका प्रयत्न करतात. त्यांतून काही चांगलं निघण्याऐवजी वाईटच जास्त घडतं. मुलांवरही लैंगिक अत्याचार घडतात यावर तर पालकांचा विश्वासच बसत नसतो. त्यांना त्यात स्वतःकडे लक्ष आकर्षित करण्याचा मुलांचा प्रयत्न वाटतो. मग इतर गोष्टींविषयी मुलं त्यांच्याशी काय सांगणार?

'वाफाळलेले दिवस' या सर्व अडचणींच्या, अवाच्य गोष्टींविषयी उघडपणे, पण सहजपणे, विनोदाच्या अंगाने सांगणारा नाट्यप्रयोग आहे. जो मुले व पालक एकत्र बसून न अवघडता, हसत हसत बघू शकतात. एक नाट्य कलाकार म्हणून या नाट्यकृतीनं मला खूप काही दिलं आहेच; पण एक मुलगी म्हणून, एक माणूस म्हणूनही मला अधिक प्रगल्भ केलं आहे.

## *वो भी क्या वक्त था..*

*बचपना गया नहीं था, और बडा भी होना था..*
*वो भी क्या वक्त था..*
*बचपना गया नहीं था, और बडा भी होना था..*
*रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने वाफाळलेले दिवस नक्की काय आहेत याचा अनुभव घ्यावा म्हणून नाटक पाहायला गेलो. लैंगिकतेसारखा विषय अतिशय गमतीदार पद्धतीने 'हाताळला' गेल्याने हास्याचे 'फवारे' उडवून मोकळा झालो. कुठल्याशा गावाच्या किंवा शहराच्या किंवा कुठल्याही ठिकाणच्या वयात येणाऱ्या पोराची ही कथा. कुण्या एका वयात संथ वाहणारा निर्मळ झरा निमिषार्धात खळाळून वाहायला लागतो आणि अंगाअंगातून पाझरणाऱ्या 'त्या' भावना मोठी गोची करून टाकतात. मग, येणारा एकटेपणा आणि त्या एकटेपणात येणारी मजा, त्यातून घडणारे चित्रविचित्र प्रसंग आपल्या मनात गच्च दाबून ठेवले जातात. हे प्रसंग जसेच्या तसे उभे केले आहेत. नेहमी बोलल्या न गेलेल्या, घरी पूर्णतः वर्ज्य असलेल्या, चुकून TV वर एखादा सीन लागलाच तर धडपडून रिमोटने बदलल्या गेलेल्या ह्या नैसर्गिक भावना म्हणजे गुन्हा नसून फक्त शरीरात होणारे बदल असतात हे सांगणारं हे नाट्यवाचन. प्रयोगाचं खरं श्रेय हे लेखनात आहे. तसेच, अशा पद्धतीचं लेखन कुठेही किळसवाणं न होण्याची जबाबदारी दिग्दर्शकाने अतिशय लीलया पेलली आहे. अर्थात, ह्या प्रकारचं सादरीकरण सर्व वर्गात रुचेल, पटेल असं नाही. पण, थोडा wide दृष्टिकोन ठेवला तर जमूही शकेल.*

*एक कलाप्रेमी,*
*- अंबर कान्हेरे.*

---

मुलांच्या लैंगिकतेकडे मी आता अधिक सजग व निकोप दृष्टीने बघू शकते. ती मला मोलाची गोष्ट वाटते. कदाचित त्यामुळेच यात उघड भाष्य असूनही यांतील संवाद उच्चारताना किंवा ऐकताना मला कधीही अवघडल्यासारखं वाटलं नाही. माझ्यासोबत इतरही मुली काम करतात. त्यांचाही हाच अनुभव आहे. सर्व मुलींना, स्त्रियांना, आयांना आपल्या नात्यातील मुलांना समजून घेण्यासाठी या नाट्यकृतीमुळे नक्कीच मदत होणार आहे.

कारण त्या या प्रयोगाकडे कशा बघतात, त्याचा कसा स्वीकार करतात हा आम्हाला धाक होता आणि त्याबाबतची उत्सुकताही होती. पण मुली या प्रयोगांना धमाल करतात. मुलांप्रमाणेच खळाळून हसत दाद देतात. मी अनेकींशी याविषयी मुद्दाम बोलले आहे आणि त्यांनी सांगितलं की मुलींच्या समस्यांविषयी बऱ्यापैकी बोललं जातं, पण मुलांच्या समस्यांविषयी कोणी फार बोलत नाहीत. आपल्याला मुलांची बाजू कळली असं त्यांचं म्हणणं होतं. तर आयांना आपल्या मुलांच्या समस्यांविषयी कळल्यामुळे याविषयी कसं बोलायचं ही त्यांची चिंता मिटली होती. या सर्व प्रतिक्रिया, एक कलाकार म्हणून आम्हाला फार मोलाच्या व आश्वासक होत्या.

**लेखिकेचा संपर्क - 86007 81726**



## Santosh Gaikwad

You and Santosh aren't connected on Facebook

Works at Writer/ Actor/ Director

Studied Drama at Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University

12:08 AM

आज तुमचा प्रयोग बघीतला...औरंगाबाद मध्ये सरस्वती भुवनमध्ये...
या प्रयोगाबद्दल उत्सुकता आधीपासूनच होती...लेखन उत्तम... पण लेखनापेक्षाही मला सादरीकरणाची कल्पना जास्त आवडली.रंगमंचाचा तुम्ही केलेला वापर ...नेपथ्य...संगीत अशा सगळ्याच बाबी उत्तम जमल्यात...अर्थात हे सगळं टिमवर्कमुळे शक्य होतं.तुमची टिम खूप छान आहे...घटना दाखवण्यापेक्षा वाचिक अभिनयाने उभी करणं खरतर अवघड काम असत़ पण तुम्ही बोलत होता आणि आम्ही त्यात हरवत जात होतो...

याचे बक्कळ प्रयोग व्हावेत...वाफ कमी होऊ नये म्हणून प्रयोगाची धगधगती आग सतत सुरू रहावी याच शुभेच्छा... प्रवासात काळजी घ्या...

# बहरते आहे प्रायोगिक रंगभूमी

## तरुण कलाकारांकडून नाट्यसंस्था सुरू; नावीन्यपूर्ण विषयांचे सादरीकरण

प्रातिनिधिक छायाचित्रे





**जागतिक रंगभूमी दिन विशेष**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

नाट्यपरंपरा टिकवण्याची आणि काळानुसार तिच्यामध्ये बदल करून समकालीन करण्याची जबाबदारी नवीन पिढीच्या खांद्यावर असते. ही पिढी एखाद्या शहरात शाळा-कॉलेजच्या वयापासून तयार होत असल्यास या नाट्यकलेला चांगले दिवस येण्याची खात्री असते. पुण्याने अशा अनेक पिढ्या पाहिल्याने पुण्यातील प्रायोगिक रंगभूमीचा गवगवा अगदी आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचलाय. या नाट्यसंस्था सध्या बहरत असल्याचे चित्र आहे. 'रंगपंढरी', 'निळू फुले अकादमी', 'आज कल', 'रंगभाषा', 'व्यक्ती पुणे' अशा अनेक नव्या प्रायोगिक संस्था तरुण नाट्यप्रेमी पिढीने सुरू केल्या असून, विषयापासून ते सादरीकरणापर्यंत नाटकांचे ते नावीन्यपूर्ण प्रयोग करताहेत.

पदव्युत्तर, विद्यार्थी किंवा नोकरी-व्यवसाय सांभाळून तरुण कलाकारांनी या नाट्यसंस्था सुरू केल्या आहेत. स्वतः लेखन-दिग्दर्शन करण्यापासून नेपथ्य-प्रकाशयोजना करण्याची जबाबदारी हे तरुण सांभाळतातच, शिवाय संस्थेसाठी पैसा उभारण्याचे आव्हानही कुशलतेने पेलतात, वेळप्रसंगी तोटाही सहन करून, ते केवळ नाट्यप्रेमापोटी. प्रायोगिक नाटके म्हणजे अवजड आणि बंडखोर विषय असा समज असताना या सगळ्या संस्थांनी सगळ्यांना अपील होतील असे विषय आपल्या नाटकांतून समोर आणण्याला प्राधान्य दिले आहे, तेही प्रायोगिक रंगभूमीची स्वतःची ओळख आणि अस्तित्त्व जपत.

'व्यावसायिक नाटकांमध्ये चेहरा आणि आर्थिक पाठबळ असते. प्रायोगिक नाटकांमध्ये मात्र प्रयोगशील आशय हाच आत्मा असल्याने काय नवीन आणता येईल याचा विचार करावा लागतो. २०१८मध्ये 'आज कल'ची सुरुवात झाली आणि एक वर्षात आम्ही 'सॉरी परांजपे', 'इतिहास गवाह है' अशी नऊ प्रायोगिक नाटके रंगमंचावर आणली. नाटकांना प्रेक्षक गर्दी करत नाही अशी ओरड खोटी वाटते, कारण चांगला आशय दिल्यास प्रेक्षक कलाकृतीला नक्की गर्दी करतात. काही दिवसांपूर्वी बालगंधर्व रंगमंदिरात सादर झालेल्या 'गंगाधर ही शक्तिमान है' या नाटकाला ७०० हून अधिक प्रेक्षक असणे हे याचेच द्योतक आहे!' असे ऋषी मनोहरने 'मटा'ला सांगितले.

'रंगपंढरी' या नाट्यसंस्थेचीही 'निरूपण', 'फडस', 'चिरंजीव' आणि 'श्री व सौ. साखरे' ही नाटके सध्या रंगमंचावर आहेत. २०१७साली सुरू झालेल्या या संस्थेत सध्या ६०हून अधिक कलाकार सक्रिय आहेत. केवळ पुणेच नाही, तर सांगली-कोल्हापूरमध्येही रंगपंढरीच्या नाटकांचे यशस्वी प्रयोग झालेत. 'प्रायोगिक रंगभूमीमध्ये कथा हाच चेहरा असल्याने आधीची नाटके पाहिलेला प्रेक्षक दुसऱ्या नाटकाला हमखास गर्दी करतो. प्रेक्षकांची स्पंदने टिपणारे आणि एखाद्या विषयाकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहायला लावणारे विषय प्रेक्षकांना आवडतात. पुण्यात असा प्रेक्षक हमखास मिळतो,' असे 'रंगपंढरी'च्या ज्ञानेश्वर विधातेने नमूद केले. 'रंगभाषा'च्या वतीने सौरभ दिघे लिखित-दिग्दर्शित 'अपरिभाषित' या दीर्घांकाची निर्मिती, 'अर्घ्य', 'पत्र निमित्तमात्र' असे नावीन्यपूर्ण प्रयोग या संस्थेने केले आहेत. '२०१५मध्ये 'रंगभाषा'ची सुरुवात झाली. कलाशिक्षण आणि मनोरंजन असा आमचा हेतू असल्याचे याचा संस्थापक अमृत सामक सांगतो.

'निळू फुले कला अकादमी'च्या माध्यमातूनही ५०हून अधिक तरुण सदस्य काम करताहेत. २०११ मध्ये सुरेश देशमुख यांच्या पुढाकाराने ही संस्था सुरू झाली. 'आम्ही एकांकिका आणि अभिवाचनाचे प्रयोग सातत्याने करतो. 'वाफाळलेले दिवस'ला उत्तम प्रतिसाद असून, प्रयोग आम्ही पुण्याबाहेरही करतोय. वेगळा दृष्टिकोन देणारे आणि विचारशील विषय पाहण्याची इच्छा असलेले प्रेक्षक प्रायोगिक नाटकांना गर्दी करतात,' असे राहुल लामखडे सांगतो.

> प्रायोगिक नाटकांसाठी काम करणाऱ्या तरुण कलाकारांची संख्या जास्त आहे. त्यांचे नवीन विचार आणि संवेदना नाटकांतून समोर येताहेत. बदल एका रात्रीत घडत नाही, त्याला काही वर्षांचा काळ जावा लागतो. त्यामुळे उद्याचे नाटक घडवणारी पिढी सक्रिय होण्याची चांगली सुरुवात झाल्याचे चित्र आहे.
>
> **- प्रसाद वनारसे,**
> ज्येष्ठ नाट्य दिग्दर्शक

> **राज्य नाट्य स्पर्धेच्या पुणे विभागाची फेरी लवकरच सुरू होईल. या वेळी ५०पेक्षा जास्त प्रायोगिक आणि हौशी नाट्यसंस्थांनी स्पर्धेसाठी नावनोंदणी केली आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत हा आकडा वीसने जास्त आहे. पुण्यात प्रायोगिक नाट्यसंस्था बहरत असल्याचे हे द्योतक म्हणावे लागेल. शहरात साधारण ७० च्या घरात प्रायोगिक नाट्यसंस्था असून, त्यातील १५ ते २० संस्था सातत्याने प्रयोग करत असल्याचे सकारात्मक चित्र आहे.**
>
> **- राहुल लामखडे,**
> दिग्दर्शक आणि राज्य नाट्य स्पर्धा पुणे समन्वयक

Scanned with CamScanner

# Fluorescent Adolescence

## Watch a theatrical reading of a novel that delves into the issues of sex and sexuality

Kimaya.Kulkarni
@timesgroup.com

TWEET @Kimaya_Mirror

Adolescence is a universally awkward experience. As hormones wreak havoc in the body and result in physical changes, the emotional and mental faculties are in flux too. The questions that adolescence brings to the mind of a 14-year-old are central to *Vafalalele Divas*, writer Pratik Puri's debut Marathi novel. This week, a theatrical reading or abhivachan of *Vafalalele Divas* will be held in the city.

Published in 2013 by Golden Page Publication, the story revolves around Apan, a male protagonist, who echoes the voice of the writer, as he addresses questions about sex, sexuality, masculinity, gender roles, and sexual attraction. "The main character refers to himself as 'Apan' (meaning 'we'). Going through puberty and adolescence is a universal experience. Everyone is going through similar problems and trying to make the most of their given situation. 'Apan' is everyone," says Puri, who moved to Pune from Wardha in 2010.

Apan is also the narrator of the story and his friends, teachers, parent and crush make up the other characters. "Apan's questions and thoughts are very much the things that I used to think about at his age. But the relatability of the adolescent experience is what makes the story timeless," adds Puri. Theatre director and actor, Rahul Lamkhade, found the novel immediately appealing when a friend gave it to him. "The moment I started reading it, I felt like doing something with the material. I visualised it in the format of an abhivachan," says Lamkhade, 24, who also plays the main role of Apan in the abhivachan.



Theatre director Rahul Lamkhade at a reading of the Marathi novel written by Pratik Puri (inset)


Apan is seen walking the tightrope between his relationships with the people around him and his inner turmoil. "He is a sensitive person who while addressing his own masculinity also thinks about how the same experience would be for a woman," says Puri. An incident where he comes to know that he was touched without consent when he was younger, makes him sympathise with his female friend who tells him she felt weird when her male teacher touched her on her shoulders. Being sexually attracted to women's bodies also makes him wonder if girls ever sexually objectify male body parts the way boys do. "Sex is seen as an unspeakable subject in our country. The consequences of this taboo can be very violent for the society. Young boys, if they don't get any guidance or don't learn to be sympathetic, end up creating problems for the society when they grow up," feels Puri.

Lamkhade, who has directed plays such as *Kheli Meli* got to play with the narration of the story during the reading. "Everyone has the script in their hands for the entire time that they're on stage. This allowed me to light the stage in such a way that there's a single light falling on the script and also lighting the character's person. It created a nostalgic atmosphere as the main character reminisces about his experiences," says Lamkhade. It was especially a challenge for him to edit the novel for the two and a half hour reading. "The point of the abhivachan is using the writer's words as they are. I collaborated with the writer to pick and choose the scenes from the novel. We mostly retained the ones that were sending a message," explains Lamkhade. The story, however, is not preachy, insists Puri. "The messages, because they are filtered by the voice of a wide-eyed 14-year-old, are very subtle. This story is by no means meant to be an education. It's a light, comical exploration of the themes around adolescence," says the writer.

The novel also talks about things like masturbation, sex, and sexual parts very explicitly, which is why Puri and Lamkhade were skeptical about how the abhivachan would be received by the audience. "It's very rare in Marathi theatre to be so open and explicit about these issues. Some people did not like that we were talking about this stuff without any apologies," says Puri. But, apart from a few acquaintances who seemed to take offense, most offered positive feedback, says the writer. "Young women came up to me saying that they loved the reading. That really felt like I did my job right as a writer," adds Puri.

**WHERE:** Sudarshan Rangmanch, Shanivar Peth
**WHEN:** July 5, 7 pm
**CALL:** 24430803
**COST:** Rs 150

दखल कर्तृत्वाची : अपयशातून झेपावलेला 'फिनिक्स' : अनिल यार्दी । पुणे पोस्ट प्रतिनिधीने करून दिलेली यथार्थ ओळख
पुस्तक परीक्षण : जगण्यातल्या परिघा भोवतीचे अस्वस्थ प्रश्न । लिहिताहेत प्रा. डॉ. चंद्रकांत पोतदार
पुस्तक परीक्षण : बाईपणाचा सर्जक वेध । लिहिताहेत प्राची-कुलकर्णी-गरुड



## लैंगिक जाणीवांचं धीट रूपांतरण 'वाफाळलेले दिवस'

'वाफाळलेले दिवस' या कादंबरीच्या अभिवाचनाचा एक नवा प्रयोग सुरु आहे. नाटकातल्या हरतऱ्हेच्या तांत्रिक गोष्टींचा उपयोग करून कादंबरीतल्या पात्रानुरूप वेगवेगळ्या कलाकारांनी सादर केलेलं हे अभिवाचन प्रेक्षकांना 'नाट्यअभिवाचन' असा एक वेगळा अनुभव देतं. ते प्रत्यक्ष अनुभवल्याशिवाय त्यातली गंमत कळणार नाही.

'पुणे पोस्ट' वार्षिक वर्गणी : ५००रु. । संपर्क : ७७२२००५०८१





# लैंगिक जाणीवांचं धीट रूपांतरण 'वाफाळलेले दिवस'

पुण्यातलं सुदर्शन कलामंच. रंगमंचावर नेपथ्य म्हणून विशेष काही नाही. कुठे कुठे बसण्यासाठी म्हणून फर्निचरचे ठोकळे ठेवलेले. एका कोपऱ्यात एक झाड. बिन पानाचे, पण त्याला फळं मात्र लटकलेली. आंबा-केळी-पेरू अशी वेगवेगळी फळे एकाच झाडाला. ते पाहून काय सुरू होणार? काय पाहायला मिळणार? 'वाफाळलेले दिवस'चा हा अभिवाचनाचा एक नवा प्रयोग म्हणजे कसा असणार, असे प्रश्न आणि शंका मनात घेऊन माझ्यासारखेच समोर बसलेले साठ-सत्तर प्रेक्षक. काही खुर्च्यांमध्ये विसावलेले, तर काही समोर अंथरलेल्या सतरंजीवर निवांत बसलेले. प्रयोगाची वेळ झाली आणि आमच्या प्रश्न आणि शंकांना विराम मिळाला. दिवे मालवले गेले. काही क्षणात समोरच्या रंगमंचावर पसरलेल्या अंधारात मध्यभागी ठेवलेल्या ठोकळ्यावर प्रकाशाचा झोत पडला. ठोकळ्यावर एक व्यक्ती बसलेली होती. पंचविशीच्या आसपासची. तिच्या हातात काही कागद होते आणि त्या व्यक्तीची नजर त्या कागदांवर खिळली होती. रंगमंचावर प्रकाश पडू लागताच ती व्यक्ती ते कागद वाचू लागली. एका लयीत. शब्दांचे-वाक्यांचे-पैरांचे अर्थ समजून घेऊन-समजावून देत ती ते कागद वाचत होती. वाचताना चेहऱ्यावर आणि अंगभर अभिनयाची मखमली-उबदार रजई घेऊन ती व्यक्ती ते कागद वाचत होती. त्या व्यक्तीचा तो उबदारपणा त्या वातावरणात हळूहळू पाझरू लागला होता. त्या व्यक्तीच्या आवाजातले चढ-उतार, वाचनाची कमी-जास्त होणारी गती आणि अधून-मधून प्रेक्षकांकडे कटाक्ष टाकत त्यांना आपल्यासोबत घेत जाण्याची त्याची हातोटी एक विलक्षण अनुभव देत होती. समोर जे चाललं होतं ते नुसतंच अभिवाचन नव्हतं आणि नेहमीच्या नाटकासारखं नाटकही नव्हतं. ते पाहत असताना मला वाटलं ते 'नाट्यभिवाचन' आहे, रूपांतरणाचा नवा प्रकार. नवा प्रयोग, नवी दिशा...

मी नवा प्रयोग म्हटल्यावर अनेकांच्या भुवया उंचावू शकतात. मात्र, तरीही मी त्याला नवा प्रयोग म्हणण्याचे धाडस करेनच. त्याची दोन कारणं आहेत. एक म्हणजे, हा नाट्यभिवाचनाचा प्रयोग नेहमीच्या रटाळ अभिवाचनाला बरेचसं रंजन मूल्य बहाल करतो. आणि दुसरे म्हणजे, नेहमीच्या फुकटातल्या अभिवाचनाची परंपरा मोडून प्रेक्षकाला तिकीटबारीवर उभा करतो. या दोन गोष्टी एखादी गोष्ट यशस्वी होण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. एखाद्या साहित्यामध्ये-कलाकृतीमध्ये जोपर्यंत रंजनात्मक मूल्याचा अभाव असतो तोपर्यंत प्रेक्षक-रसिकाच्या मनाला ती गोष्ट भिडत नाही. आणि जेव्हा प्रेक्षक खिशाला चाट





पुणे पोस्ट
प्रतिनिधी

**'वाफाळलेले दिवस' या कादंबरीच्या अभिवाचनाचा एक नवा प्रयोग सुरू आहे. नाटकातल्या हरतऱ्हेच्या तांत्रिक गोष्टींचा उपयोग करून कादंबरीतल्या पात्रानुरूप वेगवेगळ्या कलाकारांनी सादर केलेलं हे अभिवाचन प्रेक्षकांना 'नाट्यअभिवाचन' असा एक वेगळा अनुभव देतं. ते प्रत्यक्ष अनुभवल्याशिवाय त्यातली गंमत कळणार नाही.**

मारून रंजनात्मक मूल्य शोधण्यासाठी जातो, तेव्हाच तो त्या प्रयोगाची पुरेशी सकारात्मक वा नकारात्मक चर्चा करतो. अशी सकारात्मक वा नकारात्मक चर्चा घडणं हे प्रत्येक साहित्य-कलाकृतीच्या दृष्टीने अत्यंत गरजेचं असतं.

नाट्यभिवाचनाचं आणखी एक वैशिष्ट्य मला जाणवलं, ते म्हणजे त्याचं सादरीकरण. कारण नाट्यभिवाचनातलं सादरीकरण हे नाटकाच्या जवळचं जरी असलं तरी ते कादंबरीतल्या शब्दांचं तंतोतंत वाचन असल्यामुळे लेखकाला अपेक्षित असलेला अर्थच प्रेक्षकांपर्यंत पोहोचतो. अनेकदा कादंबरीचं नाटकात वा सिनेमात रूपांतरण करताना दिग्दर्शकाकडून लेखकाच्या मांडणीला, अपेक्षित भावार्थाला माध्यमाच्या गरजेसाठी तिलांजली दिली जाते. कधी कधी अतिरंजकता आणण्यासाठी भावनांचा आणि तंत्राचा अवास्तव तसेच लेखनबाह्य वापर होतो. या गोष्टी नाट्यभिवाचनात घडत नसल्यामुळे लेखक आणि रसिकामधला संवाद हा निर्भेळ होतो.

मी पाहिलेला नाट्यभिवाचनाचा प्रयोग प्रतिक पुरी यांच्या 'वाफाळलेले दिवस' या 'गोल्डन पेज पब्लिकेशन' मार्फत प्रकाशित कादंबरीवरचा आहे. सुदर्शन कलामंचावरचं त्याचं सादरीकरण 'निळू फुले कला अकादमी'ने 'अक्षरलिपी'च्या सहयोगाने सुरू केलं होतं. दिग्दर्शक राहुल लामखडे या उमद्या तरुणाने एखाद्या व्यावसायिक नाटकासाठी लागणारी हरतऱ्हेची माणसं या प्रयोगासाठी एकत्र केलेली दिसतात. तसेच नेपथ्य, प्रकाश, संगीत अशा नाटकातल्या सर्व तंत्रांचा पुरेपूर मात्र संयत वापर या अभिवाचनामध्ये केला आणि हा प्रयोग यशस्वी केला.

या नाट्यभिवाचनासाठी वाचन करणारे कलाकार हे केवळ सुस्पष्ट आणि सुव्यवस्थित वाचता येणारेच नाहीत, तर अभिनयाचा अनुभव पाठिशी बाळगून असणारे कलाकार आहेत. तसंच वेगवेगळ्या पात्रांसाठी वेगवेगळे आणि योग्य कलाकार घेतलेले आहेत. निवडलेल्या कलाकारांचं वयही साधारणतः पंचविशीच्या आसपासचं असल्याने पौगंडावस्थेतल्या गोष्टी-घडामोडींचा त्यांचा अनुभव ताजा आहे. त्याचा उपयोग कादंबरीतल्या पौगंडावस्थेतल्या मुलांचं भावविश्व, कथेतला भावार्थ अभिनिवेशासह रसिकांसमोर पोहचवून रसिकांना मंत्रमुग्ध करण्यात कलाकार यशस्वी ठरतात. म्हणूनच खिशाला चाट बसूनही नाट्यभिवाचनावर प्रेक्षक खूश होतात.

आता या नाट्यभिवाचनाचा मूळ गाभा म्हणजेच





'वाफाळलेले दिवस' या कथानकाकडे वळू यात.

'वाफाळलेले दिवस' ही प्रतिक पुरी यांची कादंबरी २०१३ साली 'गोल्डन पेज पब्लिकेशन'कडून प्रकाशित करण्यात आली. प्रतिक पुरी यांची ही पहिलीच साहित्यकृती. त्यानंतर आजपर्यंत त्यांच्या छापील आणि ऑनलाईन स्वरूपातली सुमारे २५ पुस्तकं प्रकाशित झाली आहेत. त्यांची अलीकडेच 'विश्वकर्मा पब्लिकेशन'ने प्रकाशित केलेली 'मोघपुरुस' ही कादंबरी चांगलीच चर्चेत आहे. प्रतिक पुरी हे एक प्रयोगशील तरुण कादंबरीकार आहेत. वेगळा विषय वेगळ्या विचाराने वेगळ्या शैलीत मांडण्याची त्यांची हातोटी आहे. 'वाफाळलेले दिवस' या पहिल्या कादंबरीतही या गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. पौगंडावस्थेतल्या मुला-मुलींच्या मानसिक-भावनिक-शारीरिक-सामाजिक प्रश्नांचा एक विचारी आणि विस्तृत पट त्यांनी या कादंबरीतून मांडला आहे. पौगंडावस्थेतील मुलांसाठी त्यांच्या

लगेच मोठी माणसं डोळे तरी वटारतात नाही तर खोकला नसतानाही उगाच खाकरतात. काहीही करून या असल्या गोष्टी बोलायच्या नाही हे साऱ्यांनी ठरवून टाकलेलं. म्हणजे हे स्वतः काहीही सांगणार नाही आणि कोणी विचारलं तर त्याला बोलू देणार नाही, पण सालं आपल्याला बोलायचंय. कोणाला काय वाटतं त्याच्याशी आपल्याला काही देणंघेणं नाही. झालं काय की त्या रात्री आपण झोपलो होतो. झोपेत आपल्या डोळ्यांत स्वप्न आलं. स्वप्नात चौधरींची पोट्टी. च्यायला वर्गात कधी ही आपल्याशी बोलत नाही आणि आता चक्क आपल्या स्वप्नात? आपल्या गोट्याच सटकल्या. तिनं आपल्याला खुणावलं आणि समोरच्या भिंतीतून निघून गेली. आपणही तिच्या मागोमाग गेलो. बाहेर हिरवं मैदान पसरलेलं, पण चौधरींची पोट्टी कुठंच दिसत नव्हती. आपण तिच्या शोधात निघालो. रस्त्यात तिचा स्कर्ट दिसला. चौधरी मात्र त्यात नव्हती. पुढे जातो तर तिचा शर्ट